# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८.

## मा.विधी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २०

## सभावृत्तांत

**दिनांक – १७/०९/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. सुजाता सुनिल पालांडे
३. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
४. मा.गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राजेश आगळे – सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) विशेषतज्ञ अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरणेबाबत.

विषय क्र.३) श्री.थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) यांची सह शहर अभियंता (दूरसंचार) पदावर सेवाजेष्ठतेने पदोन्नतीद्वारे नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सह.आयुक्त (आपत्ती सेवा) अभिनामाचे नविन पद निर्माण करणे बाबत.

----------

अ) मा.विधी समिती सभा कार्यपत्रिका क्र.१६ दि.१६/०७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) मा.विधी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.१९) दिनांक ०३/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १७/०९/२०२१ विभाग : ड क्षेत्रिय विदयुत

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/२४८/२०२१, दि.०९/०९/२०२१

म.न.पा.च्या प्र. क्र. ५७ (नविन प्र. क्र. २९) दापोडी ब्रिज ते तुळजा भवानी मंदीर ते सृष्टी चौक पर्यंतच्या १८ मी. डी.पी. रस्त्याच्या विकासांतर्गत विषयक कामे करणे (नि.क्र.३३/१-१८/१९) या कामातील र.रू. १६,७३,३५०/- चे शिल्लक काम ड क्षेत्रीय कार्यालय परिसरातील प्रभाग क्र. २९, २८, २६ व २५ मधील सध्या सुरू असलेली रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे तसेच नव्याने विकसित करण्यात येणारे रस्त्यांवर प्रकाश व्यवस्था करणे कामाचे आदेश एजन्सी मे.शांती इलेक्ट्रीकल्स यांना दि. १८/०२/२०१९ रोजी देण्यात आले आहेत. त्यानुसार ज्या ठिकाणी फुटपाथचे काम स्थापत्य विभागामार्फत पुर्ण करण्यात आले आहे. त्या ठिकाणी दिवाबत्तीचे खांब बदलण्याचे काम एजन्सीमार्फत स्थापत्य विभागाशी समन्वय राखुन पुर्ण करण्यात आले आहे. परंतु रामकृष्ण मंगल कार्यालय ते पिंपळे गुरव बसस्टॉप या रस्त्यावर ज्या ठिकाणी फुटपाथचे काम पुर्ण झाले त्या ठिकाणी खांब बसविण्याचे काम एजन्सीने दि.२३/०७/२०२१ रोजी पुर्ण केले आहे. परंतु या रस्त्यावर बँक ऑफ महाराष्ट्र कडे येताना डाव्या बाजुला जागा ताब्यात न आलेमुळे, स्थानिक नागरिकांनी फुटपाथचे काम करू दिले नाही व त्यामुळे या रस्त्यावर दिवे बसवण्याचे कामही एजन्सीला पुर्ण करता आलेले नाही. यामुळे या कामात एजन्सीने पुरवठा केलेले साहित्य जसे की, ७ मी. ऑक्टोगोनल खांब, 4x16 sqmm केबल, DWC पाईप, 36W व 100 WLED फिटींग शिल्लक आहेत. सदरच्या कामाची निविदा र.रू. १,६६,२५,४१३/- असुन त्यापैकी सदरच्या कामावर आत्तापर्यंत र.रू. १,१९.९६,०६४/- इतका खर्च झालेला असुन प्रत्यक्ष खर्च र.रू. १६,७३,३५०/- चे काम शिल्लक आहे. ड क्षेत्रिय कार्यालय परिसरात प्रभाग क्र. २९, २८, २६ व २५ मध्ये विविध रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे तसेच नविन रस्ते विकसीत करणेची स्थापत्य विषयक कामे सुरू आहेत. या रस्त्यांवर प्रकाश व्यवस्थेचे नुतनीकरण करणे तसेच नव्याने विकसीत होणारे रस्त्यांवर नव्यानेच दिवाबत्ती व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. याकामी सदरचे शिल्लक साहित्य मनपाच्या वाकड उप विभागाकडे जमा करून घेणे पेक्षा, सदर कामातील शिल्लक साहित्य वापरून उक्त नमुद कामेपुर्ण करणे शक्य होणार आहे. सदरचे काम करणेकरीता सदर कामाचे स्थळ बदलास मा. विधी समिती सभेची मान्यता मिळणे अत्यावश्यक आहे. सबब प्र. क्र. ५७ (नविन प्र.क्र.२९) दोपोडी ब्रिज ते तुळजा भवानी मंदीर ते सृष्टी चौक पर्यंतच्या १८ मी. डी.पी. रस्त्याच्या विकासांतर्गत विषयक कामे करणे या कामातील र.रू. १६,७३,३५०/- चे शिल्लक काम ड क्षेत्रीय कार्यालय परिसरातील प्रभाग क्र. २९, २८, २६ व २५ मधील सध्या सुरू असलेली रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे तसेच नव्याने विकसित करण्यात येणारे रस्त्यांवर प्रकाश व्यवस्था करणे कामी सदर कामाचे स्थळ बदलास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ५६ विषय क्रमांक : ०२
दिनांक : १७/०९/२०२१ विभाग : प्रशासन
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे
संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९५७/२०२१, दि.१४/०९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट “अ”मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिद्ध करण्यात आली होती. न्यूरो सर्जन व प्लॅस्टीक सर्जन ह्या विशेषतज्ञ अभिनामाची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेल द्वारे कागदपत्रे तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दिनांक १८/०९/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाव्दारे अर्ज मागविण्याची पध्दती :- www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने
२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी :- र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु. ७६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)
३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग :- सोबतचे प्रपत्र “अ”नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र ‘अ’नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे. त्या यादीमधील न्युरो सर्जन व प्लॅस्टिक सर्जन अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्तुतचा विषय महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५७ विषय क्रमांक : ०३
दिनांक : १७/०९/२०२१
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सीमा चौगुले
संदर्भ – मा.सुजाता पालांडे व मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अणुविद्युत व दुरसंचार विभागात सह शहर अभियंता (दूरसंचार) या अभिनामाचे पद मंजूर असून सध्या रिक्त आहे. श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सदर पदावर सेवाजेष्ठ असून ते B-Tech In Electronics & Communication Engineering, Diploma In Electronics & Telecommunication Engineering, महाराष्ट्र शासनाचे अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांचेकडील विद्युत अभियंता यांची व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण आहेत तसेच ते संगणक अर्हताही धारण करित आहेत. मनपामध्ये त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबाबत त्यांचे वरिष्ठांनी गेली १५ वर्षे त्यांचे गोपणीय अहवालात सतत अत्युत्कृष्ट A+ अशी नोदं

केली आहे. श्री.थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सह शहर अभियंता (दूरसंचार) या पदाकरिता महाराष्ट्र शासनाचे मंजूर सेवानियमानुसार विहीत केलेली शैक्षणीक व तांत्रिक अर्हता व अनुभव धारण करित आहेत. तसेच ते सदर पदाकरिता एकमेव अर्हताधारक व सेवाजेष्ठ कार्यकारी अभियंता (दूरसंचार) आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये CCTV सर्व्हेलन्स, फायबर ऑप्टीक केबलींग, विविध प्रकारची वायर्ड व वायरलेस कम्युनिकेशन यंत्रणा, तारांगण, विविध प्रकारची Electronics & Telecommunication Engineering संबंधीत Audio & Vidio यंत्रणा, Electronics वैद्यकिय उपकरणे इत्यादी सर्व यंत्रणांचे सूयोग्य नियंत्रण व कामाकाजासाठी श्री.थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) यांची सह शहर अभियंता (दूरसंचार) पदावर सेवाजेष्ठतेने पदोन्नतीद्वारे नेमणूक करणेस व त्यानुसार त्यांचेकडे उपरोक्त नमूद कामकाज सोपवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५८ विषय क्रमांक : ०४

दिनांक : १७/०९/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.सीमा चौगुले

संदर्भ : मा.सुजाता पालांडे व मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकिय व तांत्रीक सेवा व्यतिरिक्त अन्य सेवांच्या विभागाचे व अशा विभागातील तत्सम वेतनश्रेणी धारण करणा-या व मनपा दीर्घ सेवा झालेल्या " विभाग प्रमुख " कर्मचा-यांना देखील समान पदोन्नतीची संधी देणे आवश्यक आहे. पिंपरी चिचंवड महानगरपालिकेचे अग्नशिमन, सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन हे अत्यावश्यक सेवेचे, नागरीकांची जिवित, वित्तहानी पासुन सुरक्षा व बचाव करणारे मनपा मिळकतीचे संरक्षण, सुरक्षा करणारे महत्त्वाचे विभाग असून, आपत्ती आलेवर सदर विभागाचे कामकाज हे समन्वय ठेवून करणे आवश्यक आहे. अग्नशिामक, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा या विभागाकरीता संरक्षण दलाप्रमाणे योग्य समन्वय साधणे व प्रभावी कामकाज होणेकामी एकच वरिष्ठ नियंत्रित अधिकारी असलेस, सदर अधिका-यामार्फत संपुर्ण आपत्कालीन परिस्थितीचा आढावा घेणे, नियंत्रण ठेवणे, योग्य तो समन्वय साधुन कामकाज करणेकामी " सह. आयुक्त (आपत्ती सेवा) " हे स्वतंत्र पद नव्याने निर्माण करणेची आवश्यकता आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडील अस्तित्वात असलेले "सह. आयुक्त" या एकमेव पदाव्यतिरिक्त " सह. आयुक्त ( आपत्ती सेवा ) " असे नविन पद निर्माण करुन, सदर पदाकरीता पुढील प्रमाणे सेवा प्रवेश नियम लागू करणे आवश्यक आहे.

| क्र. | पदनाम | नेमणुक पध्दती | नव्याने मंजूर करावयाची अर्हता |
|---|---|---|---|
| १ | सह आयुक्त, (आपत्ती सेवा) १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६९०० | पदोन्नती १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवीधर २) मुख्य अग्नशिमन अधिकारी किंवा मुख्य सुरक्षा अधिकारी किंवा मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणारा सेवा जेष्ठ अधिकारी असणे आवश्यक |


तरी, प्रशासकिय व तांत्रीक संवर्गा व्यतिरिक्त उक्त प्रमाणे आपत्ती विषयक कामकाज करणा-या " विभाग प्रमुख " अधिका-यांना देखील प्रशासकीय सेवेमध्ये वरिष्ठ स्तरावर कामकाज करणेची समान संधी देणेकामी वरील प्रमाणे नविन पद निर्माण करुन सदर पदाचे आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास तसेच सदर पद निर्मीती बाबत प्रस्ताव शासनाकडे मंजुरी कामी पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती-**विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४४२/२०२१
दिनांक : २१/०९/२०२१

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.प्रशा/१/कावि/९५७/२०२१ दि.१४/०९/२०२१ विषय क्र.२ चे लगत)

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी 411 018**
प्रपत्र - अ

1) **न्यूरो सर्जन**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.वाघ अमित अनंत | खुला | निवड - 1 |
| 1 | डॉ.बोरडे तुषार दिपक | खुला | प्रतिक्षा - 1 |
| 2 | डॉ.गाडे प्रशांत सखाराम | खुला | प्रतिक्षा - 2 |
| 3 | डॉ.दिघे मोहनिष प्रभाकर | खुला | प्रतिक्षा - 3 |

2) **प्लॅस्टिक सर्जन**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.निकम राहूल मधुकर | खुला(अनु.जाती) | निवड - 1 |
| 1 | डॉ.भडगळे राहूल मोहनराव | खुला(इ.मा.व.) | प्रतिक्षा - 1 |
| 2 | डॉ.चौहान सुरजसिंह अमरसिंह | खुला | प्रतिक्षा - 2 |
| 3 | डॉ.गोवर्धन अतुल कवडूजी | खुला(अनु.जाती) | प्रतिक्षा - 3 |
| 4 | डॉ.पाटील दिपक सदाशिव | खुला | प्रतिक्षा - 4 |

(स्वाक्षरी) १५।९।२१

**अतिरिक्त आयुक्त,१**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८